SAMPLE CONTENT

# IQB
# IMPORTANT QUESTION BANK

Based on Latest Paper Pattern of Maharashtra State Board

## मराठी अक्षरभारती



"IQB KE SAATH SSC EKDUM TENSION FREE"

STD. X
(Eng. Med.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४ यांच्या
**अद्ययावत पाठ्यपुस्तकावर** आधारित

# IQB Important Question Bank

इयत्ता दहावी

# मराठी अक्षरभारती

**टळक वैशिष्ट्ये**

- कमी वेळेत बोर्डाच्या परीक्षेची परिपूर्ण तयारी.
- परीक्षेच्या दृष्टीने वेळेचे नियोजन अंतर्भूत.
- प्रश्नोत्तरांची गुणनिहाय मांडणी.
- कृतिपत्रिकेच्या अद्ययावत आराखड्यानुसार प्रश्नांची रचना.
- सर्व कवितांचे सरळ अर्थ अंतर्भूत
- भाषाभ्यासातील व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित मुबलक कृती.
- भाषाभ्यासातील घटकांच्या अभ्यसाअंती स्वाध्याय कृती उत्तरांसहित समाविष्ट
- उपयोजित लेखनाच्या उत्तम सरावासाठी कृतींचा समावेश.
- मार्च २०१९ पासून जुलै २०२३ पर्यंतच्या सर्व बोर्ड कृतिपत्रिकांमधील निवडक कृती समाविष्ट
- स्वयंमूल्यमापनासाठी नमुना कृतिपत्रिका समाविष्ट
- कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज् व नमुना कृतिपत्रिकेची उत्तरपत्रिका **Q. R. Code** द्वारे अंतर्भूत

मार्च व डिसेंबर २०२०, मार्च २०२२, मार्च व जुलै २०२३ च्या बोर्ड कृतिपत्रिका व उत्तरपत्रिका पाहण्यासाठी शेजारी दिलेला Q. R. Code स्कॅन करावा.

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 3268**

P.O. No. 10287

# प्रस्तावना

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा! हा शैक्षणिक प्रवास सुकर करण्याकरता उपयुक्त ठरणारे **टार्गेट प्रकाशनाचे IQB मराठी अक्षरभारती : इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

कमीतकमी वेळेत परीक्षेची संपूर्ण तयारी हा उद्‌देश ध्यानात ठेवून IQB या पुस्तकाची रचना केली आहे. संपूर्ण अभ्यासक्रमाची रचना ही अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यानुसार गद्य, पद्य, स्थूलवाचन, भाषाभ्यास व उपयोजित लेखन अशी विभागवार केली आहे. प्रत्येक पाठातील निवडक परिच्छेद घेऊन त्यावर गुणांनुसार कृतींचा उत्तरांसहित समावेश केला गेला आहे. पद्य विभागात कवितेच्या अधिक आकलनासाठी प्रत्येकी दोन कृतिसंच देण्यात आले आहेत. 'मुद्‌द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती' या शीर्षकाखाली प्रत्येक पद्यावर आधारित विश्लेषणात्मक कृतींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये काव्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहिण्याचा भरपूर सराव व्हावा याकरता स्वतंत्रपणे कवितांमधील सर्व काव्यपंक्तींचा समावेश केलेला आहे. कवितेतील मुद्‌द्यांवर आधारित कृती एका दृष्टिक्षेपात लक्षात याव्यात याकरता यासंबंधीचा तक्ता अंतर्भूत करण्यात आला आहे. 'स्थूलवाचन' विभागात गुणांनुसार सर्व प्रश्न सोडवून दिले आहेत.

'भाषाभ्यास' विभागात व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित विविध कृतींचा मुबलक प्रमाणात समावेश केलेला आहे. त्यांच्या अभ्यासाअंती स्वयंमूल्यमापन करण्याकरता या घटकांवर आधारित २ स्वाध्याय कृती त्यांच्या उत्तरांसहित समाविष्ट करण्यात आल्या आहेत. 'उपयोजित लेखन' या विभागात विविध लेखनप्रकारांचा आदर्श उत्तरांसहित अंतर्भाव करण्यात आला आहे. 'कृतिपत्रिकेचा आराखडा अधिक सुस्पष्ट व्हावा व स्वयंमूल्यमापन करता यावे याकरता नमुना कृतिपत्रिकेचा समावेशही यात करण्यात आला आहे. सर्व कवितांचे विश्लेषण करणारे व्हिडिओज् तसेच नमुना कृतिपत्रिकेची उत्तरपत्रिका **Q. R. Code** मार्फत देण्यात आली आहे. २०१९ पासून आतापर्यंतच्या सर्व बोर्डाच्या कृतिपत्रिकांमधील निवडक कृती समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्‌ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया. तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** चौथी

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती; चौथे पुनर्मुद्रण : २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# कृतिपत्रिका आराखडा

| विभाग १ | गद्य |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.१.** | **अ.** | **पठित गद्य** | | १५ मिनिटे |
| | १. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | २. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | ३. | स्वमत | ०३ गुण | |
| | | | **७ गुण** | |
| **प्र.१.** | **आ.** | **पठित गद्य** | | १५ मिनिटे |
| | १. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | २. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | ३. | स्वमत | ०३ गुण | |
| | | | **७ गुण** | |
| **प्र.१.** | **इ.** | **अपठित गद्य** | | १० मिनिटे |
| | १. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | २. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | | | **४ गुण** | |

| विभाग २ | पद्य |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.२.** | **अ.** | **पठित पद्य** | | १५ मिनिटे |
| | १. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | २. | आकलन कृती | ०२ गुण | |
| | ३. | कवितेतील शब्दांचा अर्थ लिहिणे (कोणतेही चार) | ०२ गुण | |
| | ४. | काव्यसौंदर्य | ०२ गुण | |
| | | | **८ गुण** | |
| | | | **एकूण गुण** | **वेळेचे नियोजन** |

Sample Content

| प्र.२. | आ. | पठित पद्य | | |
|---|---|---|---|---|
| | ६ पैकी ५ कृती देण्यात येतील. | | | १५ मिनिटे |
| | १. | कवी/कवयित्री | ०१ गुण | |
| | २. | कवितेचा विषय | ०१ गुण | |
| | ३. | सरळअर्थ | ०२ गुण | |
| | ४. | संदेश | ०२ गुण | |
| | ५. | कविता आवडण्याची / न आवडण्याची कारणे | ०२ गुण | |
| | ६. | शब्दांचा अर्थ लिहिणे (कोणतेही चार शब्द दिले जातील.) | ०२ गुण | |
| | | | **८ गुण** | |

| **विभाग ३** | **स्थूलवाचन** |
|---|---|

| | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|
| **प्र.३.** | **स्थूलवाचनावर आधारित कृती** | | |
| | ३ पैकी २ कृती सोडविणे आवश्यक स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित | **०६ गुण** | २० मिनिटे |

| **विभाग ४** | **भाष्याभ्यास** |
|---|---|

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.४.** | **अ.** | **व्याकरण घटकांवर आधारित कृती** | | |
| | १. | वाक्यप्रकार<br>(विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्‌गारार्थी, आज्ञार्थी वाक्य ओळखणे.) | ०२ गुण | १० मिनिटे |
| | २.<br>i.<br>ii.<br>iii.<br>iv. | वाक्यरूपांतर<br>प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर<br>होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर | ०२ गुण | |
| | ३. | वाक्प्रचार<br>(३ पैकी कोणतेही २) | ०४ गुण | |
| | | | **८ गुण** | |

Sample Content

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.४.** | **आ.** | **भाषिक घटकांवर आधारित कृती** | | |
| | १. | शब्दसंपत्ती<br>समानार्थी शब्द<br>विरुद्धार्थी शब्द<br>शब्दसमूहाबद्दल एक शब्द<br>एकवचन – अनेकवचन<br>लिंग बदलणे (१ गुणाच्या कोणत्याही चार कृती) | ०४ गुण | १० मिनिटे |
| | २.<br>i.<br><br><br>ii. | लेखननियमांनुसार लेखन<br>अचूक शब्द ओळखा.<br>(कोणतेही दोन शब्द-प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे. चार पर्यायांपैकी १ शब्द अचूक देणे)<br>दोन वाक्य देणे.<br>(प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देणे, ते शब्द दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित) | ०२ गुण | |
| | ३. | विरामचिन्हे<br>योग्य विरामचिन्हे वापरा किंवा विरामचिन्हे ओळखा. | ०२ गुण | |
| | | | **८ गुण** | |

## विभाग ५ | उपयोजित लेखन

| | | | एकूण गुण | वेळेचे नियोजन |
|---|---|---|---|---|
| **प्र.५.** | **अ.** | **पत्रलेखन, सारांशलेखन** | | |
| | १.<br><br><br><br>२. | औपचारिक (मागणी / विनंती)<br>किंवा<br>अनौपचारिक (अभिनंदन)<br>किंवा<br>सारांशलेखन<br>(विभाग – १ गद्य (प्र. क्र. १ (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ सारांश लिहिणे) | **०६ गुण** | १० मिनिटे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्र.५.** | **आ.** | **जाहिरात लेखन, बातमी लेखन, कथालेखन**<br>३ पैकी कोणत्याही २ कृती सोडवणे | | |
| | १. | जाहिरात लेखन (५० ते ६० शब्द) | **१० गुण** | २० मिनिटे |
| | २. | बातमी लेखन (५० ते ६० शब्द) | | |
| | ३. | कथालेखन (८० ते ९० शब्द) | | |

Sample Content

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **प्र.५.** | **इ.** | **लेखनकौशल्य**<br>३ पैकी १ निबंध लिहिणे (१०० ते १५० शब्द) | | |
| | १. | प्रसंगलेखन | ०८ गुण | २५ मिनिटे |
| | २. | आत्मकथन | | |
| | ३. | वैचारिक लेखन | | |
| | | | **२४ गुण** | |
| | | To Review and Re-checking | **-** | **१५ मिनिटे** |
| | | **एकूण** | **८० गुण** | **१८० मिनिटे** |

Sample Content

# अनुक्रमणिका


| | विभाग १ — गद्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्र.१. (अ) व (आ) | पठित गद्य उतारे | १ |
| प्र.१. (इ) | अपठित गद्य उतारे | २४ |
| | **विभाग २ — पद्य** | |
| प्र.२. (अ) | आकलन व काव्यसौंदर्यावर आधारित कृती | २९ |
| प्र.२. (आ) | मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती | ४८ |
| | मुद्द्यांच्या आधारे कवितेसबंधी कृती एका दृष्टिक्षेपात | ६३ |
| | **विभाग ३ — स्थूलवाचन** | |
| प्र.३. | स्थूलवाचन | ६५ |
| | **विभाग ४ — भाषाभ्यास** | |
| प्र.४. (अ) | व्याकरण घटकांवर आधारित कृती | ७४ |
| प्र.४. (आ) | भाषिक घटकांवर आधारित कृती | ८५ |
| • | स्वाध्याय कृती | १०० |
| • | स्वाध्याय कृती - उत्तरे | १०२ |
| | **विभाग ५ — उपयोजित लेखन** | |
| प्र.५. (अ) | पत्रलेखन | १०४ |
| | सारांशलेखन | ११८ |
| प्र.५. (आ) | जाहिरातलेखन | १२२ |
| | बातमीलेखन | १२८ |
| | कथालेखन | १३३ |
| प्र.५. (इ) | लेखनकौशल्य | १३९ |
| | **नमुना कृतिपत्रिका** | १५१ |


**सूचना :** १. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पाठांचे व पद्यांचे क्रमांक पाठ्यपुस्तकानुसार ठेवण्यात आले आहेत.

२. पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

Sample Content

विभाग १

# गद्य

## प्र. १. (अ) व (आ) : पठित गद्य उतारे

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१. (अ) व (आ)** मध्ये प्रत्येकी साधारणत: १३० ते १५० शब्दांचे दोन पठित उतारे देण्यात येतील. प्रत्येक उताऱ्यावर ७ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यामध्ये विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ७ गुणांची कृतिनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे :

१. **आकलन कृती** **२ गुण**

२. **आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतींपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

३. **स्वमत** **३ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा :**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा.
२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.
३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.
४. परीक्षेत आकलनावर आधारित आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.
५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.
६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

Sample Content

## पाठ ३ : शाल

**उतारा १**

**प्र.१.(अ) व (आ).खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

*अ. सभासंमेलने गाजवणारे कवी [ ]

ब. सुर्वेंचा मूळ स्वभाव [ ]

ii. **खालील आकृती पूर्ण करा.** (१)

[ ] ← **उताऱ्यात नमूद केलेली सन्मानाची प्रतीके** → [ ]

**[कविवर्य नारायण सुर्वे ...................................... धोकाच मोठा आहे.]**

२. i. **'खरीखुरी शालीनता' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** (१)

*ii. **कारण शोधून लिहा.** (१)

लेखकाच्या मते शालीमुळे शालीनता जाते; कारण.....

३. **स्वमत** (३)

*'शाल व शालीनता' यांचा परिच्छेदाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**[मार्च २०२२]**

**उत्तर :**

**प्र.१.(अ) व (आ).**

१. i. **चौकटी पूर्ण करा.**

*अ. सभासंमेलने गाजवणारे कवी - **कविवर्य नारायण सुर्वे**

ब. सुर्वेंचा मूळ स्वभाव - **शालीन**

ii. **शाल** ← उताऱ्यात नमूद केलेली सन्मानाची प्रतीके → **श्रीफळ**

[**टीप :** यापुढील परिच्छेदांत / पद्यांशात आकृतिबंधातील उत्तरे क्रमांक टाकून देण्यात आली आहेत. परंतु परीक्षेत विद्यार्थ्यांनी वरीलप्रमाणे सूचनेनुसार आकृती काढून त्यात उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे.]

२. i. शालीविनाच शोभणारी गोष्ट कोणती?

ii. शाल हे सन्मानाचे प्रतीक आहे व सन्मान केल्यानंतर अनेक वेळा सन्मान मिळवणारी व्यक्ती शालीनता हरवून अहंकारी बनते.

Sample Content

विभाग २

# पद्य

## प्र.२. (अ) : पद्य

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेतील पद्य विभागात **प्र.२ (अ)** मध्ये पाठ्यपुस्तकातील एक कविता देण्यात येईल. या कवितेवर ८ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यासाठी विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतिनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे :

**१. आकलन कृती** **२ गुण**

**२. आकलन कृती** **२ गुण**

या दोन्ही कृतींमध्ये 'आकृत्या पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'कोण ते लिहा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडा', 'एका वाक्यात उत्तरे लिहा', '____ हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा', '____ या आशयाची ओळ कवितेतून शोधून लिहा' इत्यादी वैविध्यपूर्ण कृती विचारण्यात येतील.

**३. कवितेतील शब्दांचा अर्थ** **२ गुण**

यामध्ये कवितेतील कोणतेही चार शब्द देण्यात येतील. त्यांचे अर्थ लिहिणे अपेक्षित आहे.

**४. काव्यसौंदर्य** **२ गुण**

यामध्ये विचारसौंदर्य, भावसौंदर्य, आशयसौंदर्य या घटकांवर २ गुणांची १ कृती विचारण्यात येईल.

**लक्षात ठेवा :**

१. दिलेले पद्य दोन वेळा वाचा.
२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.
३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.
४. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.
५. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

कवितेच्या परिपूर्ण अभ्यासासाठी आवश्यक त्या कवितांवर दोन कृतिसंच देण्यात आले आहेत.

Sample Content

## कृतिसंच १

**प्र.२.(अ). कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१. चौकटी पूर्ण करा.** (२)

*i. परमेश्वराचे दास

*ii. मेघाची विनवणी करणारा **[मार्च २०१९]**

iii. हरिणीचे पिल्लू

iv. भक्ताच्या हाकेला धावून येणारा **[मार्च २०१९]**

**[अग्निमाजि.......................................................चातक तैसा।।]**

***२. कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात, ते लिहा. [मार्च २०१९]** (२)

i. माता धावून जाते _______

ii. पृथ्वीवर (धरणीवर) पक्षिणी झेपावते______

iii. गाय हंबरत धावते _______

iv. हरिणी चिंतित होते _______

**३. खालील शब्दांचे अर्थ लिहा.** (२)

i. कनवाळू

ii. सवें **[मार्च २०२०]**

iii. अंकिला

iv. काज **[मार्च २०२०]**

**४. तैसा धांवें माझिया काजा।**
**अंकिला मी दास तुझा।।' या ओळींतील आशय स्पष्ट करा. [मार्च २०१९]** (२)

**उत्तर :**

**प्र.२.(अ).**

**१.** i. संत नामदेव ii. चातक iii. पाडस iv. परमेश्वर

**२.** i. बाळ आगीच्या तडाख्यात सापडताच माता धावून जाते.
ii. आपली पिल्ले धरणीवर कोसळताच पक्षिणी पृथ्वीवर झेपावते.
iii. भुकेल्या वासराच्या आवाजाने गाय हंबरत धावते.
iv. जंगलात वणवा लागताच हरिणी आपल्या पाडसाकरिता चिंतित होते.

**३.** i. दयाळू ii. लगेच iii. अंकित झालेला iv. काम

Sample Content

विद्यार्थ्यांच्या अधिकच्या सरावाकरिता पुढे कवितांच्या काही ओळींचा सरळ अर्थ दिला आहे.

## पद्य २ : संतवाणी (अ) अंकिला मी दास तुझा

i. **‘अग्निमाजि पडे बाळू। माता धांवें कनवाळू।।** **[मार्च २०२०]**
**तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा।।’**

**उत्तर :** आगीच्या तडाख्यात सापडलेल्या बाळाला पाहून जशी त्याची दयाळू, प्रेमळ माऊली त्याला वाचवण्यासाठी धाव घेते तसा तू माझ्यासाठी, माझ्या कामासाठी धाव घेतोस. मी तुझा अंकित झालेला, तुला शरण आलेला तुझा सेवक आहे.

ii. **वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी।।**
**नामा म्हणे मेघा जैसा। विनवितो चातक तैसा।।**

**उत्तर :** रानात वणवा पेटताच हरिणी आपल्या पाडसाच्या चिंतेने व्याकुळ होते. नामा म्हणतो, ज्याप्रमाणे पावसाची प्रतीक्षा करणारा चातक मेघाला पाऊस पाडण्यासाठी विनवणी करतो, त्याचप्रमाणे हे विठ्ठला, तुझ्या कृपेची माझ्यावर बरसात व्हावी, म्हणून मी तुझी आळवणी करत आहे.

## पद्य २ : संतवाणी (आ) योगी सर्वकाळ सुखदाता

i. **‘जेवीं चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवी पिलियांसी।**
**जीवन जैसे कां जीवांसी। तेवी सर्वांसी मृदुत्व।।**

**उत्तर :** संत एकनाथ म्हणतात, की ज्याप्रमाणे ‘चकोर’ या पक्ष्याला चंद्रकिरण अमृतासमान जीवनदायी आहे. पिल्लांसाठी पक्षिणीचे पंख सुरक्षा देणारे, आसरा देणारे आहेत, पाणी हे सजीवांसाठी ‘जीवन’ देणारे आहे, त्याप्रमाणे योगीपुरुषाच्या मृदू शब्दांचे, व्यक्तिमत्त्वाचे स्थान आपल्या जीवनात महत्त्वपूर्ण आहे.

ii. **उदकाचें सुख तें किती। सवेंचि क्षणें तृषितें होती।**
**योगिया दे स्वानंदतृप्ती। सुखासी विकृती पैं नाही।।**

**उत्तर :** पाणी प्यायल्यानंतर मिळणारे सुख कितीसे असते! ते सुख तहानलेल्या जीवाची तहान भागवण्यापुरतेच मर्यादित म्हणजेच क्षणिक (काही क्षणांचे) असते; पण योगी इतरांना आत्मानंदाच्या तृप्तीचा अनुभव करून देतो. त्या सुखाला कधीही, कोणतीही बाधा येत नाही. ते सुख चिरकाळ टिकणारे असते.

iii. **उदकाची जे मधुरता। ते रसनेसीचि तत्त्वतां।**
**योगियांचे गोडपण पाहतां। होय निवविता सर्वेंद्रियां।।**

**उत्तर :** पाण्याचा गोडवा हा फक्त जिभेला सुखावतो, तर योगीपुरुषाच्या मधुर वाणीमुळे सर्वेंद्रिय म्हणजेच पंचेंद्रियांना संतोष मिळतो.

Sample Content

# प्र.२.(आ) : मुद्द्यांच्या आधारे कवितेसबंधी कृती एका दृष्टिक्षेपात

| विषय | संदेश | आवडण्याची / न आवडण्याची कारणे |
|---|---|---|
| **अंकिला मी दास तुझा – कवी - संत नामदेव** | | |
| परमेश्वर भेटीची तीव्र इच्छा | ज्याप्रमाणे लहान बालक आपल्या आईवर पूर्णपणे विसंबून असते, 'आई हेच विश्व' मानून जगत असते, त्याप्रमाणे आपणही परमेश्वराला समर्पित व्हावे, त्याच्या चरणी लीन व्हावे, असा संदेश संत नामदेव या कवितेतून देऊ पाहतात. | साधी-सरळ भाषा, दृष्टांतांची योजना, बिंदूमध्ये सिंधूची अनुभती, गेय, वाचनीय, श्रवणीय. |
| **योगी सर्वकाळ सुखदाता – कवी - संत एकनाथ** | | |
| योगीपुरुषाच्या गुणांची पाण्याशी तुलना करून योगीपुरुषाच्या गुणांचे श्रेष्ठत्व वर्णन करणे. | योगी पुरुषाच्या सहवासात राहणे व आपला विकास घडवणे आवश्यक आहे. | समर्पक उदाहरणांतून तत्त्वज्ञानाचे कथन, कठीण विचारांचे सोपे स्पष्टीकरण, साडेतीन चरणी श्रवणीय ओव्या, गेयता, तत्कालीन मराठी भाषेचा वापर |
| **दोन दिवस – कवी - नारायण सूर्वे** | | |
| कष्टकऱ्याच्या जीवनाचे वास्तव व त्याचा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन रेखाटणे | जीवनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन असणाऱ्या कष्टकऱ्याप्रमाणे जीवनातील दु:ख, अडचणी, संकटे यांचा बाऊ न करता त्यांतून वाट काढत नव्याने जगायला शिकावे. | सोप्या भाषेत कामगारांच्या भावविश्वाचा परिचय, आशादायी व सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त होतो, निवेदनात्मक शैली, सुंदर कल्पनांची रचना |
| **औक्षण – कवयित्री - इंदिरा संत** | | |
| सीमेवर लढायला जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या जवानाविषयी, साऱ्या देशवासियांच्या मनात दाटून येणाऱ्या विविध भावनांचे चित्रण करणे | कठीण परिस्थितीतही जिद्दीने पुढे जाणाऱ्या, देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकाबद्दल आदर व कृतज्ञता बाळगावी | कमी शब्दांत उत्कट भावनांचे प्रकटीकरण, साधी, सोपी भाषा, यमक, अनुप्रास अलंकारांचा वापर |

Sample Content

विभाग ३

# स्थूलवाचन

**प्रश्नाचे स्वरूप**

कृतिपत्रिकेतील **प्र. ३** मध्ये पाठ्यपुस्तकातील स्थूलवाचनासाठी असणाऱ्या पाठांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यासाठी एकूण **६** गुण आहेत. प्रत्येकी ३ गुणांच्या ३ कृती विचारण्यात येतील व त्यांपैकी कोणत्याही २ कृती सोडवणे अपेक्षित आहे. म्हणजेच, येथे एक विकल्प देण्यात येईल.

यामध्ये पाठांचा आशय, मूल्ये, जीवनकौशल्ये यांवर भर असेल. यामध्ये पाठातील घटक, मुद्दे, पाठातील विचार-मूल्ये-संदेश इत्यादींवर स्वमत व अभिव्यक्ती यांवर आधारित कृती विचारण्यात येतील.

## मोठे होत असलेल्या मुलांनो

***१. टिपा लिहा.**

**i. बार्क** **[मार्च २०१९]**

**उत्तर :** 'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजेच 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या संस्थेच्या नावाचे लघुरूप आहे. ही अणुसंशोधन क्षेत्रात काम करणारी एक प्रचंड मोठी संस्था आहे. डॉ. होमी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला, म्हणून या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. लेखक डॉ. अनिल काकोडकर कॉलेजचे शिक्षण झाल्यानंतर या संस्थेच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षणासाठी दाखल झाले. तेथे असताना त्यांना डॉ. होमी भाभा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हे प्रशिक्षण संपल्यावर लेखक बार्कमध्ये इंजिनिअर म्हणून रुजू झाले.

**ii. डॉ. होमी भाभा** **[मार्च २०२३]**

**उत्तर :** डॉ. होमी भाभा हे प्रख्यात अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला. त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा यासाठी 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. लेखक डॉ. अनिल काकोडकर यांना भाभा अणुसंशोधन केंद्रात काम करत असताना डॉ. होमी भाभा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रचंड स्फूर्ती देणारे होते. 'आपण काय काम करायचं ते आपणच ठरवलं पाहिजे आणि आपलं काम आपणच निर्माण केलं पाहिजे' हा अतिशय महत्त्वाचा व प्रेरणादायी विचार डॉ. भाभांनी डॉ. काकोडकरांच्या मनात रुजवला.

***२. 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.** **[मार्च २०२०]**

**उत्तर :** लेखक 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'च्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षण घेत असताना तेथे त्यांच्यासह सुमारे शंभर मुले-मुली दाखल झाल्या होत्या. एवढ्या मोठ्या संख्येने



Sample Content

विभाग ४

# भाषाभ्यास

## प्र.४. (अ) : व्याकरण घटकांवर आधारित कृती

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत भाषाभ्यास विभागातील **प्र.४. (अ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे व्याकरणिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे :

**१. वाक्यप्रकार** **२ गुण**

यामध्ये विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी किंवा आज्ञार्थी वाक्ये देऊन वाक्याचा प्रकार ओळखायचा आहे. प्रत्येकी १ गुणासाठी २ वाक्ये विचारण्यात येतील.

**२. वाक्यरूपांतर** **२ गुण**

यामध्ये 'दिलेल्या सूचनेनुसार वाक्यांचे रूपांतर करणे', या प्रकारची कृती विचारण्यात येईल. यात पुढील प्रकारचे रूपांतर विचारण्यात येईल.

i. प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

ii. उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

iii. आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

iv. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

प्रत्येकी १ गुणासाठी २ वाक्ये विचारण्यात येतील.

**३. वाक्प्रचार** **४ गुण**

यामध्ये 'दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे' या प्रकारची कृती विचारण्यात येईल. तीन वाक्प्रचार देण्यात येतील व कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे अपेक्षित आहे.
(अर्थासाठी प्रत्येकी १ गुण व वाक्यात उपयोगासाठी १ गुण)

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही. फक्त वाक्प्रचारांच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे.

Sample Content

## वाक्यप्रकार

**विधानार्थी :** सरळ विधान असणारी वाक्ये
**उदा.** कल्पवृक्षाचा प्रत्येक अवयव उपयोगी असतो.

**प्रश्नार्थी :** प्रश्न विचारणारी वाक्ये
**उदा.** माझे पत्र आले का?

**आज्ञार्थी :** आज्ञा, विनंती, प्रार्थना, आशीर्वाद व्यक्त करणारी वाक्ये
**उदा.** i. दरवाजा बंद कर. (आज्ञा/हुकूम)
ii. तुझ्या सहवासात तरी मला आनंद मिळू दे. (विनंती)
iii. खूप शिक व मोठा हो. (आशीर्वाद)

**उद्गारार्थी :** एखादी भावना दर्शवणारी वाक्ये
**उदा.** i. किती सुंदर आहे ही बाग! (आनंद)
ii. छे, मला आवडत नाही हे! (घृणा)
iii. बाप रे! केवढी मोठी इमारत ही! (भीती)
iv. आई गं! किती लागलंय तुला! (काळजी)

## सराव

**१. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी/ प्रश्नार्थी/ उद्गारार्थी/ आज्ञार्थी)**

i. राष्ट्रगीताचा मान राखा. **[मार्च २०२३]**
ii. अक्षय दररोज अभ्यास करतो. **[मार्च २०२२]**
iii. लोकसभा म्हणजे काय?
iv. मावशी तुला शाळेत घालणार आहे.
v. किती भयंकर अपघात झाला असता!
vi. तू उत्तम नागरिक आहेस.
vii. तुझे वर्ष कसे वाया जाईल?
viii. नेहमी खरे बोलावे.
ix. अहाहा! किती सुंदर देखावा हा! **[मार्च २०२२]**
x. उगीच आरडाओरड करू नका.

**उत्तर :**
i. आज्ञार्थी वाक्य
ii. विधानार्थी वाक्य
iii. प्रश्नार्थी वाक्य
iv. विधानार्थी वाक्य
v. उद्गारार्थी वाक्य
vi. विधानार्थी वाक्य
vii. प्रश्नार्थी वाक्य
viii. विधानार्थी वाक्य
ix. उद्गारार्थी वाक्य
x. आज्ञार्थी वाक्य

# प्र.४. (आ) : भाषिक घटकांवर आधारित कृती

**प्रश्नाचे स्वरूप**

कृतिपत्रिकेतील भाषाभ्यास विभागात **प्र.४. (आ)** मध्ये एकूण ८ गुणांसाठी भाषिक घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील. यात समावेश असणारे भाषिक घटक गुणविभागणीसह पुढीलप्रमाणे :

**१. शब्दसंपत्ती** **४ गुण**

यामध्ये समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दसमूहाबद्दल एक शब्द, एकवचन – अनेकवचन, लिंग बदलणे या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर कृती विचारण्यात येतील. १-१ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित आहे. प्रत्येक घटकामध्ये प्रत्येकी १/२ गुणांच्या दोन कृतींचा किंवा १ गुणाच्या एका कृतीचा समावेश असेल.

**२. लेखननियमांनुसार लेखन** **२ गुण**

यामध्ये पुढील कृती विचारण्यात येतील :

अचूक शब्द ओळखा (कोणतेही दोन शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देण्यात येतील.)

वाक्य लेखननियमांनुसार लिहा (दोन वाक्ये देण्यात येतील. प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देण्यात येतील व ते दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित आहे.)

प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण व वाक्यातील प्रत्येक चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी १/२ गुण दिला जाईल.

**३. विरामचिन्हे** **२ गुण**

यामध्ये 'योग्य विरामचिन्हे वापरा' किंवा 'विरामचिन्हे ओळखा' हे कृतिप्रकार विचारण्यात येतील.

यामध्ये प्रत्येकी १ गुणासाठी दोन वाक्ये देण्यात येतील.

यातील सर्वच कृती अनिवार्य असून येथे विकल्प देण्यात येणार नाही.

## १. शब्दसंपत्ती

### समानार्थी शब्द

**१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| i. | वाट | ii. | संकट | iii. | रसना | iv. | उदक |
| v. | मेघ | vi. | आठवण | vii. | दीनवाणे | viii. | बिकट |
| ix. | झोप | x. | विश्वास | xi. | डोके | xii. | पारंगत |
| xiii. | लठ्ठ | xiv. | साखर | xv. | वायू | xvi. | प्रारंभ |
| xvii. | संकल्प | xviii. | मधुर **[मार्च २०२०]** | xix. | कनवाळू **[मार्च २०२२]** | | |

**उत्तर :** i. मार्ग, पथ ii. विपत्ती, आपत्ती iii. जीभ, जिव्हा
iv. पाणी, जल, जीवन v. ढग vi. स्मरण vii. केविलवाणे

viii. कठीण ix. निद्रा x. भरवसा xi. मस्तक, शिर
xii. निष्णात, प्रवीण xiii. जाडजूड, जाडा xiv. शर्करा
xv. वारा, पवन, वात xvi. सुरुवात xvii. निर्धार
xviii. गोड xix. दयाळू

**२. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. प्रयत्न ii. क्षमा iii. ताबा iv. लाज
v. बातमी vi. अर्धे vii. रात्र viii. अश्रू
ix. बायको x. क्रोध xi. कीव xii. अवधान
xiii. आनंद **[मार्च २०२३]** xiv. आवाज xv. पैसा
xvi. ऐट xvii. उत्साह xviii. पाऊस **[मार्च २०२०]**
xix. चंद्र **[मार्च २०१९]** xx. मित्र **[मार्च २०१९, ०२२]**

**उत्तर :** i. प्रयास ii. माफी iii. नियंत्रण iv. लज्जा
v. वार्ता vi. निम्मे vii. रजनी, निशा, यामिनी
viii. आसवे ix. पत्नी, जाया, भार्या x. राग, चीड, संताप
xi. दया xii. लक्ष xiii. हर्ष, मोद
xiv. ध्वनी, साद, रव xv. वित्त
xvi. डौल, रुबाब xvii. उल्हास, उमंग xviii. वर्षा, पर्जन्य
xix. शशी, सुधांशू xx. सखा, सवंगडी, दोस्त / सूर्य

**३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. पाय ii. उशीर iii. संध्याकाळ iv. काटा
v. लळा vi. संघर्ष vii. द्रव्य viii. शौर्य
ix. शेवट x. गाणे xi. नाच xii. थोरली
xiii. आवाका xiv. उत्कंठा xv. संधी xvi. कसब
xvii. शेपटी xviii. चौकस xix. शालीन **[मार्च २०२३]**

**उत्तर :** i. पद, चरण ii. विलंब iii. सायंकाळ iv. कंटक
v. आवड, रुची vi. लढा vii. धन, संपत्ती
viii. धाडस, साहस ix. अंत x. गीत xi. नृत्य
xii. मोठी xiii. व्याप्ती xiv. उत्सुकता xv. मोका
xvi. कौशल्य xvii. पुच्छ xviii. सतर्क xix. नम्र

**४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. दक्षता ii. माती iii. शरीर iv. पान
v. पक्षी vi. स्वाक्षरी vii. घर viii. स्तुती
ix. स्वाद x. वडील xi. प्रगती xii. नदी
xiii. आर्जव xiv. गांभीर्य

Sample Content

# स्वाध्याय कृती

## स्वाध्याय - १

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.
(आज्ञार्थी / विधानार्थी / प्रश्नार्थी / उद्‌गारार्थी)
i. किती मोठा आहे हा किल्ला!
ii. रत्नागिरीतील लाल रस्ते मला खूप आवडतात.

२. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.
i. तुम्ही इथे येऊन सत्कार स्वीकारा. (विधानार्थी करा.)
ii. माझी आई खूप मायाळू आहे. (उद्‌गारार्थी करा.)

३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)
i. हुरळून जाणे ii. झोकून देणे iii. डोळे पाणावणे

**आ. भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**१. शब्दसंपत्ती**
i. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.
अ. कडू – ब. संपदा –
ii. विरुद्‌धार्थी शब्द लिहा.
अ. थोर × ब. असमर्थ ×
iii. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.
कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला
iv. खालील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.
मला हे <u>गाणे</u> खूप आवडले आहे.

**२. लेखननियमांनुसार लेखन**
खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.
i. कुत्र्याच्या पिल्लाबद्‌दल आंतरीक ओढ वाढू लागलि.
ii. माझ्या आईने धिर न सोडता कश्टाची कामे केली.

**३. विरामचिन्हे**
खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.
i. सिंधुताई सपकाळ या सर्व मुलांच्या माई झाल्या
ii. ती मुलगी जी सुंदर गाते माझी बहीण आहे

Sample Content

## विभाग ४ - भाषाभ्यास

**अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.
(आज्ञार्थी / प्रश्नार्थी / विधानार्थी / उद्‌गारार्थी)
i. माझं नाव ओळखून दाखव. ii. तू नेहमीच सर्वांबद्दल विचार करावा.

२. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.
i. शिक्षण असेल तरच या जगात मान आहे. (नकारार्थी करा.)
ii. हे गणित अजिबात कठीण नाही. (होकारार्थी करा.)

३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)
i. बरबाद होणे ii. कीव येणे iii. खूणगाठ बांधणे

**आ. भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**१. शब्दसंपत्ती**

i. सहसंबंध ओळखा.
अ. दिवस : दिन : : आंधळा : ________
ब. मन : चित्त : : राग : ________

ii. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.
अ. मंजुळ × ब. थोरली ×

iii. खालील शब्दांचे वचन ओळखा.
अ. शाल ब. पुस्तके

iv. लिंग बदला.
अ. नर ब. देव

**२. लेखननियमांनुसार लेखन**

अचूक शब्द ओळखून लिहा.
i. ग्यानपिठ / ग्यानपीठ / ज्ञानपीठ / ज्ञानपीठ
ii. वीश्वकोश / विश्वकोश / विष्वकोश / वीश्वकोष

**३. विरामचिन्हे**

विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.
i. [ ; ] ii. [ ‘ ’ ] iii. [ : ] iv. [ ? ]

Sample Content

# स्वाध्याय कृती - उत्तरे

## स्वाध्याय - १

### विभाग ४ - भाषाभ्यास

**अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. i. उद्गारार्थी वाक्य ii. विधानार्थी वाक्य

२. i. तुम्ही इथे येऊन सत्कार स्वीकारावा.

ii. किती मायाळू आहे माझी आई!

३. i. **हुरळून जाणे** – अति आनंद होणे

**वाक्य :** एखाद्या लहानशा यशाने **हुरळून जाणे** योग्य नसते.

ii. **झोकून देणे** – स्वत:ला एखाद्या कार्यात पूर्णपणे वाहून घेणे

**वाक्य :** अंतराळवीर व्हायचे स्वप्न पाहिलेल्या कल्पना चावलाने ध्येय प्राप्त करण्यासाठी स्वत:ला **झोकून दिले**.

iii. **डोळे पाणावणे** – डोळ्यांत अश्रू येणे

**वाक्य :** रमेश व सुरेश या दोघा भावांतील गाढ प्रेम पाहून आईचे **डोळे पाणावले**.

**आ. भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**१.** i. अ. कटू ब. ऐश्वर्य, संपत्ती, दौलत

ii. अ. थोर × सान ब. असमर्थ × समर्थ

iii. कर्जबाजारी

iv. मला **ही गाणी** खूप **आवडली आहेत**.

**२.** i. कुत्र्याच्या पिल्लाबद्दल **आंतरिक** ओढ वाढू **लागली.**

ii. माझ्या आईने **धीर** न सोडता **कष्टाची** कामे केली.

**३.** i. सिंधुताई सपकाळ या सर्व मुलांच्या ‘माई’ झाल्या.

ii. ती मुलगी – जी सुंदर गाते – ती माझी बहीण आहे.

Sample Content

## विभाग ४ - भाषाभ्यास

**अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१. i. आज्ञार्थी वाक्य ii. विधानार्थी वाक्य

२. i. शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.
ii. हे गणित अगदी सोपे आहे.

३. i. **बरबाद होणे** – वाया जाणे
**वाक्य :** वाईट मित्रांच्या संगतीने गणूचे आयुष्य **बरबाद झाले**.

ii. **कीव येणे** – दया येणे
**वाक्य :** प्रत्येकवेळी खोटे बोलून शिक्षकांची मर्जी मिळवणाऱ्या सुरेखाची मला **कीव आली.**

iii. **खूणगाठ बांधणे** – मनाशी निश्चित करणे
**वाक्य :** मोठे झाल्यावर रुग्णांची सेवा करण्यासाठी मी नर्स होण्यासाठी मनाशी **खूणगाठ बांधली.**

**आ. भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**१. शब्दसंपत्ती**

i. अ. अंध ब. क्रोध

ii. अ. मंजुळ × कर्कश ब. थोरली × धाकटी

iii. अ. एकवचन ब. अनेकवचन

iv. अ. मादी ब. देवी

२. i. ज्ञानपीठ ii. विश्वकोश

३. i. अर्धविराम
ii. एकेरी अवतरण चिन्ह
iii. अपूर्ण विराम
iv. प्रश्नचिन्ह

Sample Content

# विभाग ५ उपयोजित लेखन

## प्र.५. (अ) : पत्रलेखन / सारांशलेखन

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत उपयोजित लेखन विभागात **प्र. ५ (अ)** मध्ये प्रत्येकी **६** गुणांसाठी पत्रलेखनाची व सारांशलेखनाची कृती विचारली जाईल. यात विकल्प असेल. म्हणजेच, पत्रलेखन किंवा सारांशलेखन यांपैकी कोणतीही **१** कृती सोडवणे अपेक्षित आहे.

**१. पत्रलेखन**

पत्रलेखनात औपचारिक पत्र व अनौपचारिक पत्र कृती स्वरूपात विचारली जातील. यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे. म्हणजेच, पत्रलेखनाच्या कृतीमध्ये अंतर्गत विकल्प आहे. औपचारिक पत्रासाठी मागणी किंवा विनंती व अनौपचारिक पत्रासाठी अभिनंदन हे विषय असतील.

**लक्षात ठेवा :**

१. प्रश्न काळजीपूर्वक वाचून विषय समजून घ्या.
२. दिलेल्या विकल्पापैकी कोणत्या पत्रावर तुम्ही उत्तमप्रकारे लिहू शकता त्याचा विचार करून लिहा.

**किंवा**

**२. सारांशलेखन**

कृतिपत्रिकेतील गद्य विभागातील **प्र. १ (इ)** मधील अपठित उताऱ्याचा सारांश लिहिणे अपेक्षित आहे.

**पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी :**

| क्र. | औपचारिक पत्र | अनौपचारिक पत्र |
|---|---|---|
| १. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा. | व्यक्तीचा उल्लेख योग्य प्रकारे, नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक करावा. |
| २. | पत्राचा मूळ विषय थोडक्यात लिहावा. | पत्राचा विषय लिहिण्याची आवश्यकता नसते. |
| ३. | अचूक आणि मोजक्या शब्दांत नेमका आशय लिहावा लागतो. | व्यक्तीची खुशाली विचारावी. भावना प्रभावी शब्दांत मांडाव्यात, तसेच नात्यातील जिव्हाळा व्यक्त करणारे लेखन करावे. |

Sample content

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  - Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- 3 in 1 Writing Skills
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- 3 in 1 Grammar (Language Study) & Vocabulary
  - English (HL) • Hindi (LL) • Marathi (LL)
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्) –
  SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्) –
  SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

**Visit Our Website**

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of **Std. X Question Bank** Books